# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** प्रभाग क्र. २४ अंतर्गत सुर्यानगर येथे अग्रवाल आणि **{सा.बां.विभाग झोन क्र. ०८}** चावला यांच्या घरालगत सिमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. ६१,५३,४०५/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :—**

१. प्रस्तुत कामाकरिता सन २०२२—२३ चे अंदाजपत्रकामधील पद क्र. A42001740511 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

२. सदर कामाकरिता मा. मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता क्र. CE/PWD/T.S./73/2022-23 दिनांक २०/०७/२०२२ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

३. विस्तृत माहिती नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- ४५/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २९/०७/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, झोन क्र. ०८ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २४ अंतर्गत सुर्यानगर येथे अग्रवाल आणि चावला यांच्या घरालगत सिमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. ६१,५३,४०५/— रकमेच्या (या कामाकरिता सन २०२२—२३ चे अंदाजपत्रकामधील पद क्र. A42001740511 अंतर्गत तरतूद उपलब्ध आहे.) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजूरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**